# चित्रपटातून नग्नता : सरकारचे सेन्सॉर नवधोरण

जी कला व साहित्य समाज जाणत नाही, तर उलट माणसाला विद्रूप करते अशी कला व साहित्य माण-साला हैवान बनवते.' -- दलित साहित्यीक, कॉ. अण्णाभाऊ साठे

'चित्रपट केवळ करमणुकीचे साधन नसून, समाज-शिक्षणाचे ते प्रभावी माध्यम आहे. समाजसत्तावादाची महत्ता लोकांना सांगण्यासाठी, सुसंस्कृत नीतीमूल्यांची शिकवण देण्यासाठी, समाज विज्ञाननिष्ठ करण्यासाठी ते हाताळले पाहिजे.' — व्ही. आय. लेनिन

चालू वर्षाच्या प्रारंभीच केंद्रसरकारकडे खोसला कमिशनतर्फे दोन शिफारसी सादर करण्यात आल्या. चित्रपटातून चुंबन व नग्नदेहप्रदर्शन दाखविण्याची सवलत मिळावी. केंद्रसरकारकडून या दोन्ही शिफारसी स्वीकृत करण्यात आल्या.

याबाबत असे म्हणता येईल की, आजच्या चित्र-पटांचे स्वरूप हे समाजविघातक असेच आहे, आजचे चित्रपट हे अनिष्ट प्रवृत्तीच्या कोणत्या थरास जाऊन पोहचले आहेत हे पहाता चित्रपटासारख्या प्रभावी माध्यमावर सेन्सॉर कात्रीची धार अधिक तीक्ष्ण करण्याऐवजी ती बोथट केली गेली आहे. म्हणूनच सदरचा सेन्सॉर निर्णय हा धिक्कारास्पद आहे असे म्हटल्यास त्यात काही वावगे ठरणार नाही.

नग्नप्रदर्ननाबाबत असे म्हणता येईल की, नग्न-देहप्रदर्शन कोणाचे केले जाणार किंवा होते. आजचा 'सर्वांसाठी' सर्टिफिकेटचा चित्रपट पाहिल्यावरदेखील हे समजून येईल की, नग्नप्रदर्शन कोणाचे होते.

नग्नदेहप्रदर्शनाबाबत एक खुलासा करण्यात आला आहे की, अपरिहार्य नग्नप्रदर्शन चालू शकेल. अप-रिहार्य ह्या शब्दामागील कल्पना या संदर्भात संपूर्णपणे फसवणुकीचा खेळ खेळेल. सेन्सॉरच्या नवधोरणावेळी सेन्सॉरच्या कोणत्याही निर्णयाला कोर्टात आव्हान देता येईल असेही स्पष्ट करण्यात झाले.

## केवळ शब्दाचा खेळ

फिल्मइंडस्ट्रीच्या वर्तमान मंडळींना सेन्सॉरच्या नवधोरणामुळे राक्षसी आनंद झाला असल्यात नवल नाही. अपरिहार्य या शब्दाचा वाटेल तसा फायदा उपटण्याइतपत फिल्मइंडस्ट्रीची मंडळी चतुर आहेत.

अपरिहार्य या शब्दाच्या आधाराखालीच कथानक त्या पद्धतीने रंगविणे हा फिल्मइंडस्ट्रीच्या हातचा मळ आहे. आजतागायत चित्रपटातून देहप्रदर्शन जे करण्यात आले ते सुद्धा अपरिहार्यच. अन् इथून पुढे खुल्लमखुल्ला होईल ते ही 'अपरिहार्य नग्नदेहप्रदर्शन' या नवशिफार-सीचा फायदा उपटून बेधडक होणार.

आजच्या चित्रपटाचे स्वरुप पाहिल्यास असे आढळून येते की, स्त्री देहाचे विविध प्रकारे प्रदर्शन करविण्यात कोणती उणीव बाकी ठेवली आहे? अश्लील संवाद-गाणी व गलीच्छ अशी दृश्ये तरी काय कमी आहेत? रक्तबं-बाळ हिंसाचार दाखविण्यात कोणती कसूर या मंडळींनी शिल्लक ठेवली आहे?

आपल्या बहुतेक चित्रपटाच्या कथानकाला बलात्का-राच्या दृष्याखरीज काही पुढे गतीच प्राप्त होत नाही. बलात्काराच्या प्रसंगात स्त्री पात्राला पुरुषपात्राकडून अक्षरशः अर्धविवस्त्र करण्यात येते. बलात्कार हा सूचित-पणे चित्रित करण्याचा सूज्ञपणा दाखविण्याऐवजी फिल्म-इंडस्ट्री असा हा रानटीपद्धतीचा मार्ग धुंडाळण्यात स्वतःला धन्य समजते.

वास्तवतेच्या नावाखाली चित्रपट निघतात व वाटेल ते बिभत्स प्रकार चित्रित करतात. उदरनिर्वाहाची सरळमार्गी सर्व दालने बंदिस्त झाल्यावर किंवा नोकरी मिळावी-टिकावी यासाठी देहविक्रय करण्याची वेळ एखाद्या स्त्री पात्रावर किंवा नायिकेवर ओढवते. श्रीमंत व्यक्ती किंवा मालक यांचेकडे स्वतःचे शील देण्याची इच्छा ती स्पष्ट करते. मग या व्यक्तीकडून या स्त्री पात्राला अर्धविवस्त्र करण्याचे दृष्य अपरिहार्यपणेच येते!

पान ८ वरून)

वास्तविक चित्रपट, वृत्तपत्रे, मासिके ही सारी लोकशिक्षणाची माध्यमे. ज्यायोगे समाजाला प्राप्तपरिस्थितीची जाणीव करून देऊन प्रगतीकडे वाटचाल करण्यासाठी योग्य दिशा दाखविणे शक्य असते. याउलट आपलीच तुंबडी भरणारे मोजके लोक व्यक्तीगत फायद्यासाठी याचा आपल्या सोयीनुसार हवा तसा वापर करीत असतात. समाजाला जागृत करण्याऐवजी ते विकृतीच फैलावत असतात. आणि अशाच लोकांना पूरक असणारे सरकारही याची दखल घेत नाही. पण केवळ करमणूक म्हणून सामान्यपणे आपणही याकडे दुर्लक्ष करीत असतो. आणि मग भांडवलदार वर्ग त्याचा पुरेपूर फायदा उठवतात.

तेव्हा आपण गप्प बसून, केवळ बघ्याची भूमिका घेऊन चालणार नाही. स्त्रीला एक बाजारीवस्तु, भोगदासी बनविणाऱ्यांचा कडाडून निषेध व्यक्त केला पाहिजे. स्त्री मधील इतर कोणतेही गुण लक्षात न घेता कलेच्या नावाखाली स्त्रीच्या शरीर सौंदर्याचा सौदा हे समीकरण उधळून लावलं पाहिजे. या विचारानेच आम्ही पुढे झालो आणि निदर्शने करून आमची तीव्र प्रतिक्रीया नोंदवली. यासाठी त्यावेळी पुणे शहरात गाजत असलेला ' सत्यं शिवं सुंदरम् ' हा हिंदी सिनेमा एक निमित्त म्हणून घेतला. हे निमित्त स्विकारण्याचे कारण एकच की यायोगे समाजाचे या प्रश्नाकडे लक्ष वेधले जावे आणि सरासपणे स्त्रीच्या होणाऱ्या अप्रतिष्ठेचा समाजाने गंभीरपणे विचार करावा.

## प्रतिक्रीया

मोर्चानंतरही उलट सुलट प्रतिक्रीयांचा मारा सुरूच होता. रोजच्या वर्तमानपत्रात वाचकांच्या पत्रव्यवहारात बरेचजण आपली मते मांडीत होते. काहीजण स्त्रियांच्या इतर प्रश्नावर आवाज उठवा असा सल्ला देत होते. सगळ्याच प्रतिक्रीयांचे आम्ही स्वागत केले. प्रश्न उपस्थित केल्यानंतर लोक साधक बाधक विचार करायला, चर्चा करायला तयार होतात हीच आमच्या दृष्टीने जमेची बाजू.

स्त्रीचे समाजमान्य दुय्यम स्थान पुरुषांना मान्य असेल यात नवल नाही. परंतु स्त्रियांनाही अजाणतेपणे ते मान्य आहे. आणि म्हणूनच सर्वांनी विशेषत: स्त्रियांनी अशा प्रश्नावर जाणीवपूर्वक विचार करावा, स्त्री ही व्यक्ती म्हणून नष्ट होऊन तिचा वापर केला जातो इकडे लक्ष वेधावे हाच आमचा हेतू होता, आहे. अर्थात स्त्री मुक्तीच्या कल्पनेची, विचाराची नीटशी उमजही नसणाऱ्यांना हे पचविणे तसं कठीण आहे. आपल्या मार्गातले हे अडथळे लक्षात घेऊन, ते दूर करूनच आपल्याला पुढे जावे लागणार आहे. या प्रक्रियेतीलच आमचा हा एक प्रयत्न. आणि हा असाच प्रभावीपणे पुढे नेला जाईल असा विश्वास वाटतो. पण त्यासाठी आपण स्त्रियांनीच संघटित होऊन पुढाकार घेणे गरजेचे आहे.

**— विपुल मेहता,**
सदस्य, पुरोगामी स्त्री संघटना, पुणे

---

## हरिजनांवरील अत्याचारांचे स्वरुप

नाशिक : हरिजनांवर जातीवाचक शब्द वापरुन शिवीगाळ केली आणि नागरीक हक्क संरक्षण कायद्याचा भंग केला, या आरोपावरून गेल्या सव्वा वर्षात नाशिक जिल्ह्यात एकूण ५४ गुन्हे दाखल झाले. बहुतेक प्रकरणात शिवीगाळ, जातीवाचक शब्द वापरून अपमान करणे व मारहाण झालेली आहे.

सकाळ, २१।४।१९७८

## सती जाण्याचा प्रयत्न

मणिपुरी : मृत पतीच्या चितेवर त्याच्याबरोबरच सती जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या महिलेस पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप करून वाचविले. हा प्रकार मणिपुरी जिल्ह्यातील मुराना येथे घडला.

पोलिसांनी ही कारवाई केल्याने या वेळी उपस्थित असलेल्या जमावातील काही लोक चिडले व त्यांनी पोलिसांवर दगडफेक केली.

केसरी, २२।४।७८

चित्रपटातून वासना चाळविणारे उत्तान असे भडक कॅबेरे डान्सही अपरिहार्य झाले आहेत. अमानुष असा हा नृत्याचा प्रकार व त्यापुढील गलीच्छ प्रकार निराळ्या शब्दात वर्णन करण्याची गरज नाही. अश्लील संवाद जे काही आज चित्रपटातून ऐकण्यास मिळतात ते ऐकून सर्वसामान्य माणसाला त्यातील अश्लील अर्थ तात्काळ उमगतो तर मग सेन्सॉरच्या बुद्धीबानास त्यामागील अर्थबोध होतो की नाही? असा प्रश्न पडतो. सेन्सॉरची मंडळी ना आंधळी ना बहीरी तर मग अशी अवर्णनीय दृश्ये व अश्लील संवाद सेन्सॉरच्या तीक्ष्ण धारेच्या कात्रीतून सहीसलामत कशी काय सटकतात? हाच प्रकार अश्लील अर्थ सूचीत करणाऱ्या गाण्याबाबत आहे. चित्रपटातून स्त्रीला उद्येशून लाईन, पाखरु व माल असे शब्द वापरण्यांत येतात. मराठी चित्रपटाचे एक शीर्षक 'पाच रंगाची पांच पाखरं'! पिसाट बलात्कार बेडसीन्स, स्त्री देहाचे प्रदर्शन-विटंबना, गलीच्छ दृश्ये कॅबेरे अश्लील संवाद-गाणी-शिवीगाळ, मद्यपान व रक्तबंबाळ हिंसाचार हे आजच्या बहुतेक भारतीय चित्रपटांचे समाजविघातक असे स्वरुप आहे.

वरील गोष्टींचा गंभीर विचार केल्यास, सेन्सॉर धोरण ताठर करून फिलमइंडस्ट्रीला धाक निर्माण करण्याऐवजी, उदार करून अनिष्ट प्रवृत्तीचा हैदोस घालणाऱ्या फिलमइंडस्ट्रीला जी नवीन सवलत देण्यात आली आहे, तिचे दुष्परिणाम कोणास भोगावे लागतील? 'सेक्स डॉल' अशीच स्त्रीची प्रतिमा फिलमइंडस्ट्रीने समाजापुढे सादर केली. समाजविघातक असे हे चित्रपटाचे स्वरूप पहाता, सेन्सॉरचा नवनिर्णय हा धिक्कारस्पदच असाच शेरा सूज्ञमंडळी याबाबत देतील.

लोकांनाच असला सर्व प्रकार हवा असतो अशी एक गोड तक्रार याबात करण्यात येते. (फिलमइंडस्ट्रीवर अशा मागणीदाखल लोकांनी कधी मोर्चा काढल्याचे ऐकीवात नाही.) निराधार अशी ही तक्रार आहे. अशा या प्रचारामागे लोकांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न असतो.

भोवतालच्या या भांडवली समाजरचनेत अनिष्ट प्रवृत्ती किंवा विकृती प्रचंड प्रमाणावर बोकाळली आहेच. क्षणोक्षणी अनिष्ट प्रवृत्ती वाढत आसतात. प्रश्न हा आहे की, या अनिष्ट प्रवृत्तीस खतपाणी घालायचे की, समाजविघातक अशा अनिष्ट प्रवृत्तीच्या खच्चीकरणाचा मार्ग हाताळायचा? या अनिष्ट प्रवृत्तीस खतपाणी घालणे, प्रसार करणे. त्या अधिकाधिक बोकाळू देणे हे काही मंडळींना फायदेशीर असते. तर काही मंडळी असा प्रसार बिनदिक्कतपणे करण्यात स्वतःला धन्य समजतात. विकृतीपासून सामाजिक वातावरण निरोगी व्हावे म्हणून अशा अनिष्ट प्रवृत्तींना पायबंध घालण्यासाठी कठोरपणे तिचे खच्चीकरण करणे हे महत्त्वाचे आहे. समाजाचे विकृतीकरण होऊन तो ढेपाळत जाण्यास विलंब लागत नाही. मात्र अशा समाजाची पुर्नबांधणी करणे हे दीर्घकालावधीचे व खडतर परिश्रमाचे काम आहे.

## फिलमइंडस्ट्री

आज फिलमइंडस्ट्रीतील बहुतेक मंडळी समाजविघातक अशी कला पेश करून स्वतःच्या तुंबड्या भरत आहेत. दारिद्र्याचे खडतर जीवन जगणाऱ्या भारतीय समाजाला यांनी विकृती दिली. स्त्रीची यांनी क्रूर थट्टा केली. सर्व सामान्य समाजाला यांनी रंगीबेरंगी दुनियेचे दर्शन घडविले. यांना हवी होती श्रीमंती,एअर कण्डीशण्ड बंगले,मोटारींचे ताफे, स्त्रिया, प्रचंड संपत्ती व उंची दारू. यांना हवी होती गरिबी व कष्ट मात्र न जाणवणारी. नायिका हव्या होत्या सदा तरुण. पिसाट खून व रक्तबंबाळ हिंसाचाराने यांनी पडदे रक्ताळून काढले. यांना हवे होते बेलगाम पिसाट असे बलत्कार व सेक्स. यांनी श्रमिकांचा उदो उदो केला. 'मजदूर झिंदाबाद' दाखविला अन् सांगितले श्रीमंती गरीबी ईश्वराची देणगी. स्मगलर्स, गुन्हेगारी गॅंगस् व बॉस. सोन्याची बिस्कीटे–चिपा हिरे व माणके. उंची सिगारेटस् व मद्ये. गन्स व रिव्हॉल्वर्स, आलिशान जुगारी अड्डे, नाईट क्लबस् व नग्न कॅबरे. विमान, हेलिकॉप्टर्स व बोटी. रोम, लंडन, पॅरिस अन् टोकिओ. यांनी पेश केले वेस्टर्न वारे अन् रंगेल जग.

वास्तवतेचे नाव घेऊन साहित्य व कला सादर होते. मात्र समाजजाणीव ठाऊक नसते म्हणूनच या वास्तवतेबद्दल किंवा विकृतीबद्दल या साहित्य व कलेत चीडीच्या भावनेचा लवलेशही नसतो. अपवादात्मक वास्तवतेचेही भांडवल करायचे व या वास्तवतेचा

तमाशा करायचा. समाजाच्या अंधश्रद्धेलाही यांनी हात घातला. देव–देवता, भुते–खेते, नाग–साप, मंदीरे–मशिदी, स्वर्ग- नरक पाताळ व अतर्क्य असे दैवी चमत्कार. 'जय संतोषी माता' निघतो व भारतात धमाल उडवून देतो. समाजाच्या अंधश्रद्धा दृढ केल्या अन् यांनी असा विविधमार्गी पैसा उपटला. समाजाला अनिष्ट प्रवृत्तीने पोखरणारी अशी ही कीड अन् हैवानी कला.

आज राजरोस असे चित्रपट लक्षावधींच्या संख्येने लोक पहाताहेत. चित्रपटासारखे प्रभावी माध्यम उत्तम पैकी समाजशिक्षण करण्याचे माध्यम आहे. ते माध्यम मात्र जसे हाताळले जाईल तसे त्याचे इष्ट–अनिष्ट परिणाम दिसून येतील. गैरप्रकारे हाताळण्यास हेच प्रभावी माध्यम समाजविघातक ठरते. आजच्या भारतीय चित्रपटांचे स्वरूप हे समाजविघातक असेच आहे. आज ते कोणत्या टोकास वहात चाललाय. सेन्सॉरच्या कात्रीची तीक्ष्ण धार खऱ्या अर्थाने थंडच राहिली म्हणूनच फिल्मइंडस्ट्रीने याचा फायदा उठवून ती अधिकाधिक बेलगाम होत गेली अशी वस्तुस्थिती असूनदेखील फिल्मइंडस्ट्रीला धाक निर्माण करण्याऐवजी अलीकडे सेन्सॉर धोरण उदारमतवादी झाले.

जर का सरकार व सेन्सॉर यांना याबाबत खरोखरच खेद–काळजी वाटत असेल तर गंभीर असा फेरविचार व्हावा. बेलगाम बनून भरधाव निघालेल्या फिल्मइंडस्ट्रीला लगाम घालून दाखवावा.

—दिलीप शिखरे

कोल्हापूर

---

# वैतागवाडी अशी वैतागली

पुण्यात सॅपर्स मायनर्स वसाहतीजवळ वैतागवाडीत विडीचा कारखाना आहे. मालक ठाकूर सावदेकर. तेथील ५० वर्षे विड्या वळणाऱ्या बाया सांगतात या मालकाचा आजा डोक्यावर पाटी घेऊन विड्या गोळा करत होता. आता त्याची मुलं नातवंडं झाली लक्षाधीश -आम्ही मात्र रोज १ हजार विडी मिळावी म्हणून करतो घासाघीस ! तर असा हा शून्यातून वर आलेला मालक इतके दिवस गोड बोलून तेथील स्त्रियांची फसवणूक करत होता. सणासुदीला आवळा देऊन कोहळा काढीत होता. जुन्या बाया नशिबाला बोल लावीत दिवस काढत होत्या. पण तरुण प्रौढ बायांच्यात असंतोष वाढू लागला. युनियन कशी करायची, कायदे कोणते लागू आहेत याची काहीच माहिती नाही. त्यांच्याच वसाहतीत रहाणारे व ज्यांना सामाजिक बांधीलकीची जाणीव आहे असे कार्यकर्ते मदतीला धावले. तेही या परिस्थितून गेलेले. महापालिकेचे व एस्. के. एफ्. चे कार्यकर्ते पुढे झाले. युनियन बांधताना नोकरीला मुकलेले पण ज्यांनी कामगार चळवळ हेच आपले जिवन कार्य ठरवलेले दोन कार्यकर्ते मदतीस लागले. सर्व स्त्रिया एकजुटीने सर्व श्रमिक संघात संघटित झाल्या.

### पुढेच जाता पुढेच पाय

संघटित झाल्यावर आत्मविश्वास वाढला. इतके दिवस घरोघरी मालकाच्या नावानं बोटं मोडली. हरामाचा पैसा गिळायला मालकाला लाज कशी वाटत नाही. आमच्याच कष्टावर डोक्यावरची पाटी जाऊन एकाचे चार कारखाने, गाड्या, माड्या उठल्या. 'त्याचं काही भलं व्हायचं नाही' असं नुसतं शाप देऊन काही होणार नाही. नफ्यापुढे तो काही असल्या शापाबिपावर विश्वास ठेवत नाही. एकजूट करूनच त्याचा समाचार घेतला पाहिजे. या विचाराने त्या भारल्या आणि झपाट्याने धिटाईने पुढे चालू लागल्या.

### बायजाची ओळख

काम बंद त्यामुळे कार्यकर्ते रोज त्यांना सभा घेउन माहिती देतात. स्त्रियांचे प्रश्न चव्हाट्यावर आणणाऱ्या 'बायजाची' त्यांना ओळख झाली. शिकलेल्या तरुण मुलींनी अंक घेतले. आता त्या दर रविवारी चर्चा ठेवणार आहेत. स्त्रीमुक्तीची गाणी त्यांच्या पर्यंत कार्यकर्त्यांनी पोहोचवली आहेत.

— लीला भोसले